**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ०३/२०२३ .**

**निशाणी क्र. ३२/क लगत.**

धनश्री गणेश वि. गणेश नारायण.

**दिनांक १०.०७.२०२५.**

**अर्जदार यांचा शपथेवर पुढील सरतपास अर्जदारातर्फे विधिज्ञ सौ. एस. सोनवणे यांचे मार्फतः**

१६. माझ्या शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आला आहे. तो खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. आता मला नि.क्र. २६/१ वर दाखल मे. चाळीसगांव कोर्टाच्या अंतरिम खावटीच्या आदेशाची साखांकित प्रत दाखवली. सदरील साक्षांकित प्रतीस **निशाणी क्र. ४०** देण्यात येत आहे. तसेच नि.क्र. २६/२ व ३ वर गैरअर्जदार याने एचएमपी क्र. ३६१/२०२२ मध्ये पैसे भरल्याच्या पावत्या मी दाखल केलेल्या आहेत. सदरील साक्षांकित प्रतींना **निशाणी क्र. ४१ व ४२** देण्यात येत आहे. तसेच नि.क्र. ३४/१ ते ३ वर दाखल गट क्र. ६१५/२, गट क्र. ५१३/१/अ/२/२० आणि गट क्र. १८५/१/२/५१ वरील प्रमाणित ७/१२ उतारे दाखवले. सदरील साक्षांकित ७/१२ उता–यांना अनुक्रमे **निशाणी क्र. ४३ ते ४५** देण्यात येत आहे. आता मला वर्णन यादी नि.क्र. ३४/४ वर दाखल अदखलपात्र गुन्हयाची मला दिलेली प्रत दाखवली. ती मुळ दस्तऐवज असल्याने त्यास **निशाणी क्र. ४६** देण्यात येत आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास सामनेवालातर्फे विधिज्ञ श्री. जे. पी. पाटील यांचेतर्फे–**

१७. माझे शिक्षण १२ वी पर्यंत झालेले आहे. माझे लग्न दि. ०५ फेब्रुवारी २०१८ मध्ये झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न चाळीसगांव येथे झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न सर्वांच्या पसंतीने व परवानगीने झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, लग्नामध्ये मंडपाचा, जेवणाचा व वाजंत्री यांचा खर्च जाबदेणार याने केला. या

POOJA NARAYAN KOKATE

Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2025.07.10 18:00:46 +0530

सर्व गोष्टींचा खर्च माझ्या मामांनी केला. सदर गोष्टींवर खर्च केल्याबाबतचा पावत्या मी दाखल केलेल्या नाहीत. सदर पावत्या न दाखल करण्याचे कारण की मी माझ्या मामांना त्या पावत्या सांभाळून ठेवण्यास सांगितले नाही. परंतू, तसे असेल तर ते मी पुढील तारखेस दाखल करेन. हे म्हणणे खरे नाही की, लग्न जाबदेणार यांचेकडे असल्याने सोने, चांदीच्या वस्तु जाबदेणार यांनी घेतल्या होत्या. सोने मामांनी व वडीलांनी घेतले होते. त्याच्या पावत्या मी न्यायालयात दाखल केलेल्या नाहीत. सदर पावत्या हया जाबदेणार यांच्याकडे असल्याने मी त्या दाखल करु शकणार नाही. सदर पावत्या भा. द. वि. कलम ४९८–अ अंतर्गत जो गुन्हा जाबदेणार यांच्याविरुध्द प्रलंबित आहे त्यामध्ये दाखल आहेत.

१८. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१८ ते २०२३ या कालावधीत जाबदेणार यांनी माझा हुंडयासाठी छळ केला नाही. सदर छळाबाबत मी चाळीसगांव येथील पोलीस निरिक्षक यांना फोन केला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या अर्जामध्ये कोणत्या दिनांकांना जाबदेणार यांनी माझा छळ केला, पैसे मागितले हे नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, ते पैसे कोणत्या कारणासाठी मागितले ते कारणही त्यामध्ये नमुद नाही. जाबदेणार यांच्या विधिज्ञांनी शपथपत्र नि.क्र. ३२ त्यांना दिलेली प्रत अर्जदार हिस दाखवून त्यामध्ये ते पैसे ज्या कारणासाठी मागितले ते दाखविण्यास सांगितले. सदरील कारण हे माझे शपथपत्रात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार याने पैशाची मागणी न केल्याने त्याबाबत त्यामध्ये नमुद नाही. मी चाळीसगांव पोलीस स्टेशन येथे सदर त्रासाच्या ०२ वर्षानंतर तक्रार दिली. त्यामध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल झालेला आहे.

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2025.07.10 18:00:51 +0530

<u>**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ०३/२०२३ .**</u>

<u>**निशाणी क्र. ३२/क लगत.**</u>

धनश्री गणेश वि. गणेश नारायण.

१९. माझे पती हे आर्मी मध्ये नोकरीस असल्याने त्यांना जवळपास रु. ८०,०००/– पगार आहे याबाबतचे पगारपत्रक मी दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार हे आर्मीत असल्याने त्यांना परत परत सुटया मिळत नाहीत, ०६ महिन्यांनी अथवा १० महिन्यांनी मिळतात. जाबदेणार पती यांचे बेकायदेशीर संबंध आहेत परंतू, त्याचा पुरावा मी दाखल केलेला नाही. सदर पुरावा माझ्याकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे शपथपत्र नि.क्र. ३२ वरील परिच्छेद क्र. १३ मध्ये मी जे नमुद केलेले आहे की, माझे वडील व मामा यांनी जाबदेणार यांना अडीच ते तीन तोडे सोन्याचे दागिने चढविले त्याच्या पावत्या मी दाखल केलेल्या नाहीत. कारण, त्या जाबदेणार यांच्या ताब्यात आहेत. सदर सोने परत मिळण्यासाठी मी अर्ज दाखल केला असे जे सदर परिच्छेदात नमुद केलेले आहे, त्याबाबत मी कोठे अर्ज केला हे सांगू शकत नाही.

२०. हे म्हणणे खरे नाही की, मी जेवढया कालावधीपुरती जाबदेणार यांच्याकडे नांदले त्या कालावधीत मी त्यांना आत्महत्या करण्याच्या धमक्या देत होते. हे म्हणणे खरे आहे की, सुरुवातीच्या काळात जाबदेणार हा गडचिरोली या नक्षलवादी भागात कर्तव्यावर होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी असा हट्ट धरला की मला देखील सोबत घेवून जा. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी जाबदेणार याने मला समजून सांगितले की, नक्षलवादी भाग असल्याने परिवार सोबत घेवून जाता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार याने त्यांच्या वरिष्ठांच्या परवानगी घेवून मला त्यांच्यासोबत नेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझा स्वभाव क्रोधी असल्याने मी तेथेही त्यांच्याशी भांडणे करायची.

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2025.07.10 18:00:56 +0530

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ०३/२०२३ .**

**निशाणी क्र. ३२/क लगत.**

धनश्री गणेश वि. गणेश नारायण.

२१. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस माझे व जाबदेणार यांचे लग्न झाले त्यावेळेस माझे व माझ्या वडीलांमध्ये वाद होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आमच्याकडील लग्न पत्रीकेत आम्ही वडीलांचे नाव घेतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझा स्वभाव भांडखोर व क्रोधी असल्याने मी माझ्या वडीलांचे नाव पत्रीकेमध्ये घेतले नाही.

२२. हे म्हणणे खरे आहे की, मला एक मुलगा नामे सिध्दांत हा असून माझे प्रसुती चाळीगांव येथे झाली. हे म्हणणे खरे नाही की, माझी प्रसुती चाळीसगांव येथे झाल्याने त्याचा खर्च जाबदेणार यांनी केला. माझ्या प्रसुतीचा खर्च माझ्या मामांनी केला. सदर खर्चाच्या पावत्या मी सदर अर्जाचे कामी दाखल केलेल्या नाहीत. माझा मुलगा ०५ वर्षाचा आहे. त्याला चाळीसगांव येथील गुरुकूल येथे टाकले आहे. मी १५ दिवस शिरपूर व १५ दिवस चाळीसगांव येथे राहते. माझा मुलगा हा चाळीसगांव येथे मामांकडे राहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आजही चाळीसगांव येथे राहते व स्थायिकही तेथेच आहे.

२३. हे म्हणणे खरे आहे की, चाळीसगांव येथे विवाह विच्छेदनाचा जो अर्ज जाबदेणार याने दाखल केलेला आहे त्यामध्ये मी जे शपथपत्र दाखल केले आहे त्यात मी शिरपूर येथून ये-जा करते असे नमूद केलेले आहे. सदर न्यायालयाने मला येण्याजाण्याचा खर्च म्हणून रक्कम रु. ६,०००/- मंजूर केलेला आहे. मी तेथे नियमित येण्याजाण्याचा खर्च घेत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यापासून होणा-या त्रासाने माझे सासरे वारले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अर्जामध्ये हुंडा व छळाबाबत मी जी कथने केली ती खोटी कथने केलेली आहेत.

POOJA NARAYAN KOKATE

Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2025.07.10 18:01:00 +0530

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ०३/२०२३ .**

**निशाणी क्र. ३२/क लगत.**

धनश्री गणेश वि. गणेश नारायण.

२४. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार त्याचे वडील मृत्यू पावल्यावर सन २०२१ मध्ये घरी आला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस दशविधी क्रियेच्या कार्यक्रमाप्रसंगी मी घराच्या आतमध्ये जावून दरवाजा बंद करुन घेतला. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार यांच्या नातेवाईकांनी दरवाजा ठोठावला तरी मी उघडला नाही, त्यामुळे त्यांनी माझ्या मामांना बोलाविले. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार हे देशसेवेमध्ये असल्याने ते मला वेळ देवू शकत नसल्याने मी त्यांच्याविरुध्द खोटा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत**

POOJA NARAYAN KOKATE

Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2025.07.10 18:01:06 +0530

शिरपूर. (श्रीमती पूजा ना. कोकाटे)

दिनांक १०.०७.२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१),

शिरपूर, जि. धुळे.